## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे आयोजित "मिलेट (तृणधान्य) महोत्सव-२०२४"
## दि.१७ ते २१ जानेवारी, २०२४, श्री गणेश कला क्रिडा रंगमंच, स्वारगेट, पुणे

**सस्नेह नमस्कार,**

**नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पने अंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा शेतमाल मिळावा या उद्देशाने विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केले. या निमित्ताने देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले. तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषक तत्वामुळे सामान्य ग्राहक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. तृणधान्याचे आरोग्यविषयक असलेले अनन्यसाधारण महत्व विचारात घेता जास्तीत जास्त लोकांच्या आहारातील त्यांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत तृणधान्यातून मूल्यवर्धित उत्पादने तयार करणारी मोठ्या प्रमाणात नवउद्योजक तयार झालेले आहेत.

यास अनुसरून **"उत्पादक ते ग्राहक" थेट विक्री** संकल्पनेअंतर्गत **महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्यावतीने 'मिलेट महोत्सव-२०२४' चे आयोजन 'श्री गणेश कला क्रिडा रंगमंच' स्वारगेट, पुणे येथे दि.१७ ते २१ जानेवारी, २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे**. यामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टर्ट कंपन्या सहभागी होणार आहेत.

सदर उत्पादकांना सुमारे ५० स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार असुन ग्राहकांना अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा हि तृणधान्ये व यापासुन तयार करण्यात येणारा **ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नाविण्यपुर्ण अशी असंख्य उत्पादने थेट उत्पादकांकडुन प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.** याबरोबरच मिलेट उत्पादन, मुल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्व या विषयी नामांकित तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे.

तरी नववर्षाची सुरूवात आरोग्यपूर्ण करणेसाठी मिलेट महोत्सवास आवर्जून भेट द्यावी, हि विनंती.

**अधिक माहितीसाठी संपर्क** - श्री. उमाकांत वाघ मो. क्र -९९७५०२४००० श्री. आनंद शुक्ल मो. क्र. ८७८८५९७८३४

## महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

आयोजित

INTERNATIONAL YEAR OF MILLETS 2023

# मिलेट (तृणधान्य) महोत्सव २०२४

राज्यातील तृणधान्य

## उत्पादकांकडून थेट ग्राहकांपर्यंत

तृणधान्य व त्यापासून बनविलेल्या उत्पादनांच्या खरेदीची सुवर्ण संधी!








**तृणधान्यांपासून बनविलेल्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्स् !**





## तृणधान्य व तृणधान्यापासून तयार केलेल्या उत्पादनांच्या खरेदीसाठी अवश्य भेट द्या.

**दिनांक १७ ते २१ जानेवारी २०२४ - सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत**

स्थळ : **श्री गणेश कला क्रिडा रंगमंच, स्वारगेट, पुणे**

संपर्क : ९९७५०२४०००, ८७८८५९७८३४